लोकमत 12 JUL 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकीचा आंतरविद्याशाखीय अभ्यास हवा

## मनुकीड पार्निच्कून : शिवाजी विद्यापीठात 'मेकॅट्रॉनिक्स'वरील कार्यशाळेला प्रारंभ

कोल्हापूर : अभियांत्रिकीच्या क्षेत्रात आता विशेषीकरणासह सर्वच अभियांत्रिकी शाखांचा सीमाविरहित आंतरविद्याशाखीय अभ्यास करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन थायलंडच्या एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. मनुकीड पार्निच्कून यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात 'मेकॅट्रॉनिक्स : सिनर्जिक इंटिग्रेशन ऑफ मॅकेनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी' विषयावरील कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटीव्ह फॉर अकॅडेमिक नेटवर्क्स (ग्यान) या उपक्रमांतर्गत कार्यशाळा आयोजित केली आहे. टाटा टेक्नॉलॉजीचे संस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी एस. डी. प्रधान यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. यावेळी टाटा टेक्नॉलॉजीचे माजी उपाध्यक्ष कुमार रामचंद्रन प्रमुख उपस्थित होते.

प्रा. मनुकीड म्हणाले, मेकॅनिकल अभियंत्याने आवश्यक असलेल्या हार्डवेअरसाठीचा प्रोग्राम स्वतःच तयार केला, तर त्याला हवा तो निकाल मिळू शकतो. विविध समस्यांवर मॅकेनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या संगमातून निर्माण झालेल्या 'मॅकेट्रॉनिक्स' या आंतरविद्याशाखेच्या माध्यमातून उपाय शोधणे शक्य आहे.

एस. डी. प्रधान म्हणाले, 'बाऊंड्रीलेस इंजिनिअर' या संकल्पनेची आपल्या देशाला मोठी गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता या संकल्पनेमुळे पूर्वीच्या अनेक मूलभूत संकल्पना नव्या दृष्टीने अभ्यासणे गरजेचे आहे. शिक्षण व उद्योग क्षेत्रातील सुसंवाद वाढवावा.

कुमार रामचंद्रन म्हणाले, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या बळावर चारशे वर्षांत झाले नाहीत, इतके गतिमान बदल येत्या तीस ते चाळीस वर्षांत होणे अपेक्षित आहे. त्यासाठी अभियांत्रिकी शाखांचा एकात्मिक दृष्टिकोनातून अभ्यास आवश्यक आहे. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात टाटा टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून विद्यार्थी, नवअभियंत्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम राबवू.

डॉ. मोरे म्हणाले, अभियांत्रिकी क्षेत्रात मानवी जीवनावर दूरगामी परिणाम करणारे बदल गतीने होत आहेत. त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी प्रत्येकालाच अनुषंगिक बदल करवून घ्यावे लागतील. कार्यक्रमास डॉ. जी. एस. कुलकर्णी, आर. के. कामत, ए. एम. गुरव, उदय पाटील, विद्याधर कांबळे, आदी उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांनी स्वागत केले. जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



### इतिहास अभ्यासणार

थायलंडवर भारतीय संस्कृतीचा मोठा प्रभाव असल्याचे प्रा. मनुकीड यांनी सांगितले. ते म्हणाले, महाराष्ट्रासह कोल्हापुरात मी प्रथमच आलो आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी बरीच माहिती ऐकण्यात आली. त्यामुळे आता येथून गेल्यानंतर त्यांच्या इतिहासाचा अभ्यास करणार आहे.

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सकाळ 12 JUL 2016

# विद्यापीठात आज 'यिन'तर्फे शैक्षणिक धोरणावर चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ११ : डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशनच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व शिवाजी विद्यापीठातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरण' विषयावर उद्या (ता. १२) चर्चासत्र होत आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात तीन वाजता त्यास सुरवात होईल. नव्या शैक्षणिक धोरणावर कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यांतील प्राचार्य एकत्र येऊन विचारमंथन करणार आहेत. माजी केंद्रीय सचिव टी. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शैक्षणिक धोरणासंबंधी शिफारशी केल्या आहेत. त्याविषयी चर्चा होणार आहे. 'सकाळ' माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार, कार्यकारी संपादक मनोज साळुंखे, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत चर्चासत्र होईल.



YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी 12 JUL 2016

# अभियंत्यास अभियांत्रिकीच्या कोणत्याही शाखेचे वावडे नसावे

## प्रा. मनुकीड; विद्यापीठात 'ग्यान' कार्यशाळेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगातील कोणत्याही अभियंत्याला अभियांत्रिकीच्या कोणत्याही शाखांचे वावडे नसावे. मेकॅनिकल अभियंत्याने आवश्यक हार्डवेअरसाठीचा प्रोग्राम स्वतः तयार केल्यास त्याला हवा तो निकाल मिळू शकेल. अभियांत्रिकीच्या क्षेत्रात आता स्पेशलायझेशनबरोबरच सर्वच अभियांत्रिकी शाखांचा सीमाविरहित आंतरविद्याशाखीय अभ्यास करणे काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन थायलंड येथील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील प्रा. मनुकीड पार्निच्कून यांनी केले.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे प्रायोजित 'ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क्स' (ग्यान) या उपक्रमांतर्गत सोमवार (दि.११) पासून विद्यापीठात 'मेकॅट्रॉनिक्स : सिनर्जिक इंटिग्रेशन ऑफ मेकॅनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स ॲंड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे होते. टाटा टेक्नॉलॉजीजचे संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी व इक्विनॉक्स कंपनीचे संस्थापक अध्यक्ष एस. डी. प्रधान यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना प्रा. मनुकीड.

टाटा टेक्नॉलॉजीज्चे माजी उपाध्यक्ष कुमार रामचंद्रन प्रमुख उपस्थित होते.

प्रा. मनुकीड म्हणाले, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या संगमातून निर्माण झालेल्या मेकॅट्रॉनिक्स या आंतरविद्याशाखेच्या माध्यमातून उपाय शोधता येणे शक्य आहे. थायलंडची ए.आय.टी. आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यादरम्यान यापूर्वीच झालेल्या सामंजस्य कराराला 'ग्यान' उपक्रमामुळे पुनरुज्जीवन लाभले आहे. थायलंडवर भारतीय संस्कृतीचा मोठा प्रभाव असून महाराष्ट्रत आणि कोल्हापुरात प्रथमच आलो असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी बरीच माहिती ऐकण्यात आली. शिवाजी महाराजांच्या इतिहासाचाही अभ्यास करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एस.डी. प्रधान म्हणाले, 'बाऊंड्रीलेस इंजिनिअर' या संकल्पनेची जगाला विशेषतः भारताला मोठी गरज आहे. आतापर्यंत अभियांत्रिकीने वाफ, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स व आयटी व कृत्रिम बुद्धिमत्ता, बायोटेक्नॉलॉजी असा प्रवास केला आहे. ए.आय. संकल्पनेमुळे पूर्वीच्या अनेक मूलभूत संकल्पनांकडे नव्या दृष्टीने अभ्यासण्याची गरज निर्माण झाली आहे. कुमार रामचंद्रन म्हणाले, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या बळावर चारशे वर्षांत झाले नाहीत, इतके गतिमान बदल चाळीस वर्षात होणार आहेत. त्यासाठी अभियांत्रिकी शाखांचा एकात्मिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची गरज आहे. अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे म्हणाले, अभियांत्रिकी क्षेत्रात मानवी जीवनावर आणि जीवनशैलीवर दूरगामी परिणाम करणारे बदल गतीने होत आहेत. या बदलांशी पूरक अशा पद्धतीने जुळवून घेण्यासाठी प्रत्येकाला बदल करून घ्यावे लागतील. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे.एस. बागी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. 'ग्यान' प्रकल्पाविषयी समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी माहिती दिली. कार्यशाळा समन्वयक उदय पाटील यांनी परिचय करून दिला. जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. ए.एम. गुरव, विद्याधर कांबळे आदी उपस्थित होते.

---

पुण्यनगरी 12 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भियांत्रिकीचा आंतरविद्याशाखीय अभ्यास गरजेचा

## मनुकीड यांचे प्रतिपादन ■ शिवाजी विद्यापीठात मॅकेट्रॉनिक्ससंदर्भातील 'ग्यान' कार्यशाळेस सुरुवात

पूर / प्रतिनिधी : त्रिकी क्षेत्रात आता नबरोबरच सर्वच अभियांत्रिकी ाविरहित आंतरविद्याशाखीय णे ही काळाची गरज आहे, न थायलंड येथील एशियन ऑफ टेक्नॉलॉजी येथील प्रा. र्निच्कून यांनी केले.

नुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे लोबल इनिशिएटिव्ह फॉर नेटवर्क्स' (ग्यान) या सोमवारपासून शिवाजी 'मेकॅट्रॉनिक्स : सिनर्जिक इंटिग्रेशन ऑफ मॅकेनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. मनुकीड बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

टाटा टेक्नॉलॉजीजचे संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी व इक्विनॉक्स कंपनीचे संस्थापक अध्यक्ष एस.डी. प्रधान यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी टाटा टेक्नॉलॉजीजचे माजी उपाध्यक्ष कुमार रामचंद्रन प्रमुख उपस्थित होते.

प्रा. मनुकीड म्हणाले, जगातील कोणत्याही अभियंत्याला अभियांत्रिकीच्या अन्य शाखांचे वावडे असता कामा नये. मेकॅनिकल अभियंत्याने त्याला आवश्यक असलेल्या हार्डवेअरसाठीचा प्रोग्राम स्वतःच तयार केला, तर त्याला हवा तो निकाल मिळू शकतो. यासारख्या समस्यांवर मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या संगमातून निर्माण झालेल्या मॅकेट्रॉनिक्स या आंतरविद्याशाखेच्या माध्यमातून उपाय शोधता येणे शक्य झाले आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठमध्ये कार्यशाळेत बोलताना एआयटी, थायलंडचे प्रा. मनुकीड.

थायलंडवर भारतीय संस्कृतीचा मोठा प्रभाव असून महाराष्ट्रात आणि कोल्हापुरात आपण प्रथमच आलो असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी बरीच माहिती ऐकण्यात आली. त्यामुळे आता येथून गेल्यानंतर शिवाजी महाराजांच्या इतिहासाचाही आपण अभ्यास करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

एस. डी. प्रधान, ए. आय. मुळे, कुमार रामचंद्रन यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, गतिमान युगात आपले अस्तित्व टिकवायचे असेल, तर या बदलांशी जुळवून घ्यावे लागेल. त्या दृष्टीने उपयुक्त दृष्टिकोन अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांत विकसित करण्यात ही कार्यशाळा निश्चित यशस्वी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रधान यांच्या हस्ते कार्यशाळेचे डिजिटल उद्घाटन करण्यात आले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. 'ग्यान' प्रकल्पाविषयी समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी माहिती दिली. कार्यशाळा समन्वयक उदय पाटील यांनी परिचय करून दिला. जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव, विद्याधर कांबळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

